


दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार

ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक

सिंधुदुर्ग मुंबई www.sindhudurgsamachar.in T-2/RNP/SDG-06/2024-2026

संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम




नोंदणी क्रं. एमलव्ही /२१/०९ रजिस्ट्रेशन क्र. ४३७११ /८५ | गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर २०२५ | ● पाने ४ ● वर्ष ४० ● अंक १६ ● किंमत ३ रु. ● सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, गोवा, मुंबई, पुणे

सूर्योदय: ०७ : ००
सूर्यास्त: १८ : ०१

**भरती**
सांय. ४:२५ सायं.१६:५६

**ओहोटी**
स. ११:०७ सायं. २२:४२

**रत्नागिरी**
कमाल तापमान : ३४.६
किमान तापमान : १९.२

**मुंबई (सांताक्रूझ)**
कमाल तापमान : ३३.८
किमान तापमान : १६.७

**हवामान**
उत्तर कोकण : कोरडे
द. कोकण व गोवा : कोरडे

**शेअर मार्केट**
सेन्सेक्स : ८४,३९१.२७ (-२७५.०१) (-०.३२%)
निफ्टी : ५० – २५,७५८.०० (-८१.६५) (-०.३२%)

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अतिवृष्टीबाबत नुकसानभरपाई जाहीर

# कुडाळ मतदारसंघ आघाडीवर

**सिंधुदुर्ग । प्रतिनिधी**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीच्या प्रचंड नुकसानीसाठी शासनाने अखेर नुकसानभरपाई जाहीर केली आहे. एकूण ४ कोटी रुपयांची आर्थिक मदत जिल्ह्यासाठी मंजूर करण्यात आली असून यात सर्वाधिक हिस्सा कुडाळ मतदारसंघाला मिळाला आहे.

यावर्षी मान्सून दरम्यान जून, जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात सतत पावसाचा जोर कायम होता. या मुसळधार पावसामुळे शेतकरी कामे ठप्प झाली होती. पिकांची वाढ खुंटली, अनेक ठिकाणी पिके आर्द्रतेमुळे खराब झाली. त्यातच ऑक्टोबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या आशांना मोठा तडा दिला. पिकलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेय तर अनेक उभ्या पिकांना पुन्हा कोंब फुटल्याने उत्पादनावर परिणाम झाला. या सर्व नुकसानीचे पंचनामे शासनामार्फत करण्यात आले होते.



या अहवालांच्या आधारे घोषित करण्यात आलेल्या नुकसानभरपाईतून केवळ सिंधुदुर्ग जिल्ह्यालाच ४ कोटी रुपयांची मदत मंजूर झाली आहे. विशेष म्हणजे, यातील ५० टक्क्यांपेक्षा अधिक नुकसानभरपाई कुडाळ मतदारसंघातील शेतकऱ्यांना देण्यात आली आहे.

आमदार निलेश राणे यांनी अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी प्रशासनाला तात्काळ आणि व्यापक पंचनामे करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर झालेल्या कार्यवाहीत कुडाळ तालुक्यातील ८८९१ शेतकरी, तर मालवण तालुक्यातील ३१२२ शेतकऱ्यांना नुकसानभरपाई जाहीर झाली. एकूण १२,०१३ शेतकऱ्यांना मिळून २ कोटी ७९ लाख ६० हजार ७५५ रुपये इतकी रक्कम वितरीत होणार आहे. कुडाळ मतदारसंघाला मिळालेल्या या मोठ्या आर्थिक मदतीबद्दल आमदार निलेश राणे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे कौतुक होत आहे. अतिवृष्टीने उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना ही नुकसानभरपाई दिलासा देणारी ठरणार आहे.

# जलजीवन मिशन रखडल्याने संताप

## एक महिन्यात कामे सुरु न झाल्यास मोर्चाचा इशारा-वैभव नाईक

**सिंधुदुर्ग । प्रतिनिधी**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेली चार वर्षे जलजीवन मिशन योजना सुरू असली तरी ७१८ नळयोजनेपैकी एकाही नवीन नळयोजनाचे काम पूर्ण झालेले नाही. जुन्या नळयोजनेची दुरुस्ती झाली असली तरी नवीन कामे निधीअभावी रखडली आहेत. केंद्र व राज्य सरकारकडून निधी न मिळाल्यामुळे आणि ठेकेदारांकडून दुर्लक्ष झाल्याने ही योजना अर्धवट अवस्थेत थांबली असून पूर्णपणे फेल होण्याची वेळ आली आहे, अशी टीका माजी आमदार वैभव नाईक यांनी केली.

जिल्ह्यातील सत्ताधारी लोक प्रतिनिधींनी कधीही आढावा बैठक न घेतल्याने परिस्थिती बिघडत गेली असून उन्हाळ्यात पाण्यासाठी नागरिकांची मोठी परवड होणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. "पुढील एक महिन्यात कामांना गती मिळाली नाही, तर सरपंच आणि ग्रामस्थांना घेऊन जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागावर मोर्चा काढला जाईल," असा इशारा नाईक यांनी पत्रकार परिषदेत दिला. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र खेबुडकर हे सकारात्मक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र, "केंद्र-राज्य सरकारकडून एक रुपयाही निधी मिळाला नाहीय स्थानिक आमदार निधी आणण्यात अपयशी ठरल्याने इतर जिल्ह्यातील ठेकेदार कामे सोडून पळून गेले," असे नाईक म्हणाले.

जलजीवन मिशनअंतर्गत जुन्या नळयोजना बंद पडल्यास त्यांची दुरुस्ती करण्यासाठी स्वतंत्र निधी मिळणार नसल्याने, अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी सर्व ठेकेदारांची एकत्रित बैठक बोलावावी, अशी सूचना त्यांनी प्रशासनाला केली.




कुडाळ-मालवण तालुक्यातील रखडलेली कामे पाहता नाईक यांनी आज CEO खेबुडकर यांची भेट घेतली.

यावेळी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुदेश राणे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता श्री. वाळके, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कुडाळ तालुकाप्रमुख कृष्णा धुरी,तालुका संघटक बबन बोभाटे,युवासेना जिल्हाप्रमुख मंदार शिरसाट, युवासेना तालुकाप्रमुख योगेश धुरी,माणगाव सरपंच मनीषा भोसले, पावशी उपसरपंच लक्ष्मीकांत तेली, अवधूत गायचोर, गुरु गडकर,राहुल सावंत आदि उपस्थित होते.

## तरंदळे धरणात उडी घेऊन तरुण-तरुणीची आत्महत्या

# कणकवली तालुक्यात खळबळ





**कणकवली । प्रतिनिधी**

तरंदळे येथील धरणात एका तरुण आणि तरुणीने उडी घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी उशिरा रात्री उघडकीस आली. या दोघांनीही इतके टोकाचे पाऊल का उचलले याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून संपूर्ण कणकवली तालुक्यात या घटनेने खळबळ उडाली आहे.

मृत तरुणाची ओळख सोहम कृष्णा चिंदरकर (वय २२, रा. कुंभारवाडी, कलमठ) अशी तर मृत युवतीची ओळख ईश्वरी दीपक राणे (वय १८, रा. बांधकरवाडी, कणकवली) अशी झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी सोहमचा मोबाईल हरवला होता. हरवलेला मोबाईल शोधण्यासाठी तो संध्याकाळी सुमारे ७ वाजता चुलत भावाच्या दुचाकीवरून घराबाहेर पडला.मात्र रात्री उशिरापर्यंत तो घरी परतला नाही, त्यामुळे कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली.

दरम्यान, मोबाईल हरवल्यानंतर सोहमने आईचा मोबाईल वापरून ईश्वरीला व्हॉट्सअॅप्पवर संदेश पाठवला होता. त्यात "आपण तरंदळे धरणावर जाऊया" असे लिहिले होते. हा संदेश कुटुंबीयांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तातडीने तरंदळे धरणाकडे धाव घेतली. धरण परिसरात बॅटरीच्या सहाय्याने शोध घेतला असता दोघांचेही मृतदेह पाण्यात आढळून आले.

कणकवली पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. या दोघांच्या मृत्यूमुळे कणकवली तालुक्यात शोककळा पसरली असून या आत्महत्येमागील नेमके कारण जाणून घेण्यासाठी पोलिस तपास सुरू आहे.

**थोडक्यात**

### उच्च शिक्षणात मातृभाषेबरोबर भारतीय भाषा शिकणे अनिवार्य

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्यात शाळांमध्ये पाचवीपर्यंत मातृभाषा शिकणे अनिवार्य केल्यानंतर, आता उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही भारतीय भाषांकडे वळवण्यासाठी शिक्षण मंत्रालयाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. विद्यार्थ्यांनी मातृभाषेबरोबर आणखी एक भारतीय भाषा शिकावी, या उद्देशाने यूजीसी आणि भारतीय भाषा समिती संयुक्तपणे "Learn One More Bharatiya Bhasha" मोहीम सुरू करत आहे. या उपक्रमात संविधानाच्या आठव्या अनुसूचीत असलेल्या २२ भारतीय भाषा समाविष्ट असून, विद्यार्थ्यांना आपली पसंतीची भाषा निवडण्याची मुभा असेल. शाळांनंतर आता उच्च शिक्षणात बहुभाषिकतेला चालना देणे, सांस्कृतिक समृद्धी वाढवणे आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणे या उद्देशाने ही मोहीम राबवण्यात येत आहे.

**उपक्रमाची रचना आणि सुविधा**

विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम त्रिस्तरीय स्तरावर उपलब्ध असतीलकृबेसिक, इंटरमीडिएट आणि एडव्हान्स.

Ability Enhancement Course - क्रेडिटसह

Credit Course - पदवीमध्ये गणले जाणारे

Audit Course – ज्ञानसंपन्नतेसाठी, क्रेडिट नाही

अभ्यासक्रम ऑफलाइन आणि ऑनलाइन दोन्ही मोडमध्ये उपलब्ध राहतील. १२वी उत्तीर्ण आणि १६ वर्षांवरील विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. विद्यार्थ्यांना कधीही प्रवेश घेण्याचा किंवा बाहेर पडण्याचा पर्याय असेल. २०२६-२७ पासून या उपक्रमात जास्तीत जास्त अभ्यासक्रम सुरू करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे.

## पोईप कॉलेजमधील विद्यार्थी राज सुधाकर गोसावी यांचा प्रामाणिकपणा

### राठिवडे येथील महिलेचे हरवलेले पाकीट केले परत

**मालवण/पोईप । संतोष हिवाळेकर**

पोईप येथील एस टी चालक सुधाकर गोसावी यांचा मुलगा राज सुधाकर गोसावी याला दहा दिवसांपूर्वी त्यांच्या घरासमोरील रस्त्यावर एका अज्ञाताचे पेसै असलेले पाकिट सापडले होते. मात्र त्या पाकिटामध्ये कोणताही पूरावा न आढळल्यामुळे ते पाकिट कोणाचे हे समजणे कठीण झाले होते.

दरम्यान, पोईप येथील रिक्षा चालक महेश पालव यांना या विषयीची खबर लागताच त्यांनी राज गोसावी यांना भेटून पाकिट उघडून पाहीले असता सोनवडेकर आडनावाचा कागद मिळाला. त्यावरून महेश पालव यांनी हे पाकिट राठिवडे येथील सोनवडेकर यांचे असावे असे सांगितले. त्यानंतर सोनवडेकर यांच्याशी संपर्क साधला असता सदर चे पाकिट माझेच पडले



होते असे राधा नंदकिशोर सोनवडेकर यांनी त्वरित सांगितले.

तब्बल चार दिवसांनंतर आज रोख रक्कम अकरा हजार पाचशे रुपये असलेले पाकिट राज गोसावी यांनी राधा नंदकिशोर सोनवडेकरना सूपूर्द केले. राज गोसावी या कॉलेज युवकाच्या प्रामाणिक वर्तणुकीचे पोईप पंचक्रोशीत कौतुक होत आहे व अभिनंदन होत आहे.

मालवण आगाराचे पोईप येथील एस टी चालक सुधाकर गोसावी यांचा राज मुलगा आहे . राज गोसावी या कॉलेज युवकाने आपल्या प्रमाणीक पणाचा आर्दश सर्वांन समोर ठेवला आहे. यावेळी संपदा गोसावी, प्रविण पांचाळ, सागर सोनवडेकर, राधा नंदकिशोर सोनवडेकर आदी उपस्थित होते.

## कणकवली शहरातील कनकनगर व बिजलीनगर येथील केटी बंधाऱ्याला लोखंडी प्लेट टाकून पाणी अडवा

### युवासेना जिल्हाप्रमुख सुशांत नाईक यांची लघु पाटबंधारे विभागाकडे मागणी

**कणकवली । प्रतिनिधी**

कणकवली शहरातील बिजलीनगर व कनकनगर येथील केटी बंधाऱ्याला लोखंडी प्लेट टाकून पाणी अडवा अशी मागणी युवासेना जिल्हाप्रमुख सुशांत नाईक यांनी लघु पाटबंधारे विभागाच्या शिंदे मॅडम यांच्याकडे केली आहे. येत्या ८ दिवसात बिजलीनगर व कनकनगर येथील केटी बंधाऱ्याला लोखंडी प्लेट टाकून पाणी अडवा. अशी मागणी केली आहे. नदीपात्रातील वाहून जाणारे पाणी प्लेट टाकून अडवल्यावर याचा फायदा कणकवली शहरातील नागरिकांना होणार आहे. गडनदिवरील कनकनगर व मराठा मंडळजवळील केटी बंधाऱ्याला प्लेट टाकून पाणी अडवल्यास त्याचा फायदा हा कणकवली शहरातील जलस्रोतांना होतो. यावर्षी डिसेंबर महिना आला तरी अद्यापही प्लेट लावल्या नसल्याने हे पाणी वाहून जात आहे. यामुळे शहरातील जलस्रोतांची



पाण्याची पातळी खालावत चालली आहे. भविष्यात शहरातील नागरिकांना पाण्याची टंचाई भासू नसे या दृष्टीने आताच या दोन्ही बंधाऱ्यांना लोखंडी प्लेट टाकून पाणी अडवा अशी मागणी युवासेना जिल्हाप्रमुख सुशांत नाईक यांनी लघु पाटबंधारे विभागाकडे केली आहे. येत्या ८ दिवसात बंधाऱ्याला प्लेट टाकून पाणी न अडवल्यास पाटबंधारे कार्यालयावर धडक देण्याचा इशारा यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख सुशांत नाईक यांनी दिला.

## खारेपाटण किल्ल्यावर मावळे आम्ही स्वराज्याचे ची स्वच्छता मोहीम



**वैभववाडी । प्रतिनिधी**

"मावळे आम्ही स्वराज्याचे -वैभववाडी विभाग" यांच्या वतीने खारेपाटण किल्ल्यावर दिवाळीपासून सातत्याने स्वच्छता आणि संवर्धनाच्या मोहिमा राबविण्यात येत आहेत. किल्ल्याच्या तटबंदीला हानी पोहोचवू शकणारी अनावश्यक झाडे, झुडपे आणि वेली काढून टाकण्यासाठी नुकतीच आणखी एक विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत मावळ्यांनी मोठ्या उत्साहाने आणि परिश्रमाने किल्ल्याची साफसफाई पूर्ण केली. यापूर्वी केवळ दिंडी दरवाजा एवढाच भाग लोकांना माहिती होता. पण वैभववाडी विभागातील दुर्गसेवक आणि सेविकांनी एकत्रितपणे प्रयत्न करून संपूर्ण खारेपाटण किल्ला स्वच्छ आणि लोकांच्या निदर्शनास येईल अशा स्थितीत आणला आहे. या मोहिमेद्वारे किल्ल्याचा इतिहास, रचना आणि महत्त्वाचा संपूर्ण भाग आता स्पष्टपणे दिसू लागला आहे.

या विशेष उपक्रमात किल्ल्याच्या पूर्व बाजूचा दिंडी दरवाजा, त्यालगतची तटबंदी, भुयारी मार्ग, दक्षिणेकडील बुरुज, तसेच पश्चिमेकडील बुरुज आणि तटबंदी यांची काटेकोरपणे स्वच्छता करण्यात आली. झुडपे, वेली आणि कचरा हटवून किल्ल्याचे मूळ सौंदर्य उभारेण्याचा प्रयत्न करण्यात आला. स्वच्छता मोहिमेत अनेक मावळ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# शिवसेनेचा भगवा जिल्हा पंचायतीवर फडकवूया -वैभव नाईक

**कुडाळ । पांडुशेठ साठम**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या संभाव्य उमेदवारांची कुडाळ येथे झालेल्या बैठकीत माजी आमदार वैभव नाईक यांनी आगामी निवडणुकांसाठी मोर्चेबांधणीचे आवाहन केले.

सत्ताधारी आमदार-खासदारांनी गेल्या वर्षभरात कुडाळ तालुक्याचा कोणताच विकास केला नसल्याची टीका त्यांनी यावेळी केली. नाईक म्हणाले, "शाळा - हायस्कूल बंद करण्यापासून ते जलजीवन मिशनच्या कामात झालेल्या पूर्ण अपयशापर्यंत सत्ताधाऱ्यांचा नाकर्तेपणा स्पष्ट आहे. कुडाळमध्ये रस्त्यांची अवस्था बिकट असून आरोग्य सुविधा ढासळल्या आहेत. आम्ही सुरू केलेल्या मेडिकल कॉलेजमधूनही नागरिकांना योग्य सुविधा मिळत नाहीत. गोव्याला उपचारांसाठी जावे लागणे ही सत्ताधाऱ्यांची अपयशाची पावती आहे."

जनतेचे प्रश्न सोडवण्याची ताकद फक्त शिवसेनेत असल्याचे नमूद करत त्यांनी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सक्रिय होण्याचे आवाहन केले. कुडाळ तालुक्यातील जिल्हा परिषद मतदार संघ आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब



ठाकरे पक्षाचे संभाव्य उमेदवार आणि पदाधिकारी यांची बैठक माजी आमदार वैभव नाईक यांच्या उपस्थितीत कुडाळ येथे संपन्न झाली. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कुडाळ तालुकाप्रमुख पदी कृष्णा धुरी व कुडाळ तालुका संघटकपदी सचिन कदम यांची निवड झाल्याने शिवसेना कुडाळ तालुक्याच्या वतीने माजी आमदार वैभव नाईक यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी उपजिल्हाप्रमुख अमरसेन सावंत, युवासेना जिल्हाप्रमुख मंदार शिरसाट, कुडाळ तालुकासंपर्क प्रमुख अतुल बंगे, तालुकाप्रमुख राजन नाईक, तालुका संघटक बबन बोभाटे, उपतालुकाप्रमुख बाळा कोरगांवकर, अवधूत मालणकर, विभागप्रमुख दिपक आंगणे, मंगेश बांदेकर, बाळा कांदळकर, गंगाराम सडवेलकर, दत्ताराम उभारे, शैलेश विरनोडकर, राजेंद्र घाडीगावकर, नरेंद्र राणे, दशरथ मेस्त्री आदी उपस्थित होते.

**सिंधुदुर्ग समाचार**

दैनिक सिंधुदूर्ग समाचारमधून आपल्या बातम्या, अडचणी थेट वाचकांपर्यंत पोहचविण्यात येतील आणि त्याला नावासहित प्रसिध्दी दिली जाईल, लेख, कथा, कविता sindhudurg.samachar@gmail.com या ईमेल वर पाठवू शकता. तसेच सिंधुदुर्ग समाचारचा अंक सुरु करण्यासाठी व जाहिराती, बातम्यांसाठी संपर्क ९८२२९७९७३२. kdrupa@gmail.com

# डॉ. बाबा आप्पासाहेब आढाव

## संघर्ष, सामाजिक जाण आणि मानवी हक्कांची अखंड लढाई

**भारतीय** सामाजिक चळवळींच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ज्यांची कार्ये, विचारसरणी आणि सार्वजनिक आयुष्य ही केवळ नोंदींच्या पानापुरती मर्यादित राहत नाहीत, तर त्यांनी उभारलेली चळवळ, जागवलेली जाणीव आणि समाजात उभा केलेला जागर हा पुढच्या पिढ्यांनाही मार्गदर्शक ठरतो. डॉ. बाबासाहेब पांडुरंग उर्फ बाबा आढाव हे त्यापैकीच एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व. ९६ वर्षांच्या प्रवासात त्यांनी असंघटित, उपेक्षित, वंचित आणि पीडित मजूरवर्गाचा प्रश्न फक्त नोंदवून घेतला नाही, तर त्यांना संघटित करत त्यांच्या हक्कांसाठी थेट रस्त्यावर, न्यायालयात आणि शासनाच्या दारात झगडले. पुण्यातील खासगी रुग्णालयात झालेल्या त्यांच्या निधनाने एका मोठ्या काळाचा शेवट झाला, परंतु त्यांनी पेटवलेली मशाल आजही जिवंत राहील ती त्या जाणिवेतून, जागृतीतून आणि न्यायाच्या मशालीतून.

बाबा आढाव यांनी तरुणपणीच मजूरवर्गाच्या वेदना उलगडून पाहिल्या. बाजार समित्यांमधील हमाल, माथाडी कामगार, भाजीपाला आणि फळबाजारातील रोजंदारी मजूर यांच्या जीवनात कोणतीही स्थैर्याची खात्री नव्हती. मजुरीचा दर ठरवण्याचा कोणताही नियम नव्हता. आजारी पडले की अन्नाचे दाणेही मिळत नसत. अशा वेळी बाबा आढाव यांनी त्यांच्या वेदना स्वत:च्या आयुष्याशी जोडून घेतल्या. त्यांना वाटले की असंघटित मजुरांसाठी आवाज देणारा कोणीच नाही, तर हा आवाज त्यांनीच व्हावे. १९६०-७० च्या दशकातील पुण्यातून सुरू झालेली ‘हामाल–माथाडा’ चळवळ पुढे संपूर्ण महाराष्ट्रभर पसरली आणि हजारो मजूरांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणला.

माथाडी कामगारांसाठी असलेल्या विशेष कायद्याचा जन्मही त्यांच्या संघर्षातूनच झाला. हा कायदा केवळ कागदावरील दस्तऐवज नव्हता, तर तो वंचितांच्या जगण्याचा आधार होता. बाबा आढाव यांच्या सातत्याने शासनाला, समाजाला आणि व्यवस्थेला लक्षात आणून देण्यात आले की असंघटित मजूर हा राष्ट्राच्या आर्थिक घडणीतला अपरिहार्य भाग आहे आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण झाल्याशिवाय समाज न्याय्य होऊ शकत नाही. त्यांनी कधी संघटनांवर अवलंबून राहिले नाहीत. त्यांनी संघटना निर्माण केल्या. त्यांनी कधी शासन बदलण्याची भाषा केली नाही, त्यांनी शासनाला कामगार हितासाठी विचार बदलायला भाग पाडले.

आजचे पुणे, पुण्याचा बाजारभाव, गडबडलेले ट्रान्सपोर्ट सिस्टीम, कोल्हापूर–नाशिक–मुंबई मार्गावरील मालाचे वितरण या सगळ्या चौकटीत माथाडी कामगारांचे स्थान निश्चित झाले आहे. या सगळ्यामागे बाबा आढाव यांच्या संघर्षाची सावली आहे. असंघटितांना संघटित करण्याची, विखुरलेल्या समाजघटकांना न्याय देण्याची आणि प्रत्येक मानवास प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार मिळवून देण्याची ताकद त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होती.

बाबांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची शांत, परंतु अत्यंत ठाम भूमिका. शब्दांनी नव्हे, तर कृतीने त्यांनी स्वत:ची ओळख निर्माण केली. कामगारांचे प्रश्न समजून घेण्यासाठी ते थेट त्यांच्या वस्त्यांमध्ये जात असत. मजुरांच्या जेवणाच्या घासातली कडवट चव त्यांनी अनुभवली. त्यांच्या मुलांच्या शिक्षणापासून ते त्यांच्या आरोग्यापर्यंतचा प्रश्न कोणताही असो,



बाबा आढावांनी त्यासाठी झटणे हे आपले कर्तव्य समजले. त्यांच्या कार्याचा पट एवढाच नव्हता, स्त्रीसक्षमीकरण, व्यसनमुक्ती, आणि ग्रामीण भागातील शोषितांसाठी त्यांनी समानतेचा मार्ग शोधला.

त्यांच्या आयुष्याचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे ‘‘सामूहिक विवाह’’ चळवळ. समाजातील खर्चिक, दिखाऊ, दगलबाज रितीरिवाजांच्या विरोधात त्यांनी सरळसोट पद्धतीने सामूहिक विवाहांना चालना दिली. अशा विवाहांमुळे केवळ अर्थसंकल्पच हलका झाला नाही, तर सामाजिक स्तर, जात, धर्म यांपलीकडचा एकतेचा संदेशही दृढ झाला. त्यांना सदैव वाटत असे की समाजातील बदल हा तळागाळातूनच घडतो, आणि ते बदल घडवण्याचे धैर्य त्यांच्याकडे होते.

संपूर्ण आयुष्यभर त्यांनी कोणत्याही सत्तेशी तडजोड केली नाही. कधी जनतेसाठी तर कधी मजुरांसाठी, तर कधी बाजारातील अन्यायाविरुद्ध ते आवाज उठवत. वयाच्या उत्तरार्धातही त्यांनी संघर्ष सोडला नाही. ९० वर्षे ओलांडूनही ते आंदोलनांच्या अग्रभागी दिसत असतकृकधी मजुरांच्या वेतनाबद्दल, कधी त्यांच्या कल्याण योजनांबद्दल, तर कधी प्रशासनाच्या निष्क्रियतेबद्दल.

त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्रातील हमाल–माथाडी समाजात हळहळ व्यक्त होत आहे. पुण्याच्या मार्केट यार्डात त्यांचे पार्थिव नेण्यात आले, तेव्हा हजारो माथाडी कामगारांनी डोळ्यांत अश्रू आणून आपल्या नेत्याला अखेरचा निरोप दिला. ते म्हणत होते .‘‘बाबा गेले, पण आम्हाला संघटितपणाचा वारसा देऊन गेले.’’

संपादकीय दृष्टीकोनातून पाहता, बाबा आढाव यांचे जीवन हे केवळ एका नेत्याची कहाणी नाही, ते एक मॉडेल आहे. नेतृत्वाचे, प्रामाणिकपणाचे, संघर्षाचे आणि सामाजिक बांधिलकीचे मॉडेल. आजच्या काळात जेव्हा समाज विभाजित होतोय, मूल्ये कोमेजत आहेत, स्वार्थाच्या राजकारणाने जेव्हा समाजाचा पोत ढासळतो आहे, अशा वेळी बाबा आढाव यांचे जीवन आपल्याला नेतृत्व हे शब्दांवर नव्हे तर कार्यावर उभे असते हे सत्य दाखवून देत आहे.

त्यांच्या जाण्याने निश्चितच एक पोकळी निर्माण झाली आहे. पण आपण जर त्यांच्या विचारांचा, कार्याचा आणि समाजासाठी असलेल्या कर्तव्यबुद्धीचा वारसा पुढे नेला तरच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. मजुरांच्या हक्कांसाठी लढाई आजही संपलेली नाही. असंघटित मजुरांची अवस्था आजही अनेक ठिकाणी बदललेली नाही. त्यामुळे बाबा आढाव यांची आठवण करताना आपल्यावरही एक नैतिक बंधन जबाबदारी येत आहे आणि ती म्हणजे समाजातील दुर्बल घटकांसाठी उभे राहण्याची, अन्यायाच्या विरोधात बोलण्याची आणि प्रत्येकाला सन्मानाने जगता येईल असा समाज उभारण्याची.

बाबा आयुष्यभर म्हणत राहिले ‘‘माणूस मोठा त्याच्या पदाने नाही, तर त्याच्या कामाने होतो .’’

त्यांचे संपूर्ण जीवन हे या वाक्याचा जिवंत पुरावा आहे. हीच त्यांना मानवंदना. करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई.

---

## वाचक पत्र

### खर्चिक अधिवेशनांची फलश्रुती किती ?

**राज्य** विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूरनगरीत सोमवारपासून सुरु झाले आहे. यंदाचे हे अधिवेशन विविध गोष्टींमुळे चर्चेत आहे. ५८ वर्षानंतर पहिल्यांदाच हे अधिवेशन विरोधी पक्षनेत्याविना पार पडत आहे. केवळ सात दिवस चालणाऱ्या अधिवेशनाच्या सिद्धतेसाठी सरकारी तिजोरीतून कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने विधान भवन, रविभवन, नागभवन आणि आमदार निवासस्थानांसह विविध इमारती, रस्ते आणि त्यांच्या दुरुस्तीवर आजतागायत १०० कोटीहुन अधिक रुपये खर्च केले आहेत याशिवाय आमदारांच्या दैनंदिन सोयी सुविधा आणि खानपान यांसाठी सात दिवसांत प्रतिदिन २० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. लाडक्या बहिणींच्या बँक खात्यांवर दर महिन्याला पैसे तर पडत आहेत, मात्र रस्त्यावर वावरताना या लाडक्या बहिणी दिवसाढवळ्यासुद्धा स्वतःला असुरक्षित समजत आहेत, स्त्री अत्याचाराच्या बाबतीत शिवरायांच्या महाराष्ट्राने देशात आज अव्वल स्थान मिळवले आहे, शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतकऱ्यांना मिळणारी तारीख पे तारीख, युती सरकार सत्तेवर आल्यापासून १ लक्ष १२ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची अधिकृत आकडेवारी यांसोबत नेहमीचे विषय आहेतच. यावेळी विरोधकांचे संख्याबळ कमी असले तरी सत्ताधारी मंत्री महोदयांना घेरण्याची पूर्ण सिद्धता त्यांनी केली असल्याचे पत्रकार परिषद घेऊन सुरुवातीलाच सांगण्यात आले आहे.

राज्यातील सामान्य जनतेच्या प्रश्नांवर आणि समस्यांवर सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांनी एकत्रितपणे सारासार चर्चा करून त्यावर ठोस उपाययोजना काढण्याच्या दृष्टीने भरवण्यात येणाऱ्या अधिवेशनांच्या एकूण कालखंडात साधक–बाधक चर्चा नेमकी किती काळ होते? अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच विरोधी पक्षाची मंडळी अधिवेशन चालू न देण्याच्याच तयारीत असतात. जनतेचे कोणते प्रश्न सभागृहात मांडायचे यापेक्षा सरकारला कोंडीत कसे पकडायचे यामध्येच यांना अधिक स्वारस्य असते. सभागृहाच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन करणे, अधूनमधून सभात्याग करणे, चर्चेच्या कालावधीत आरडाओरड आणि घोषणाबाजी करत गोंधळ घालणे यांसारख्या प्रकारांमुळे अधिवेशन काळात सभागृहाला रणांगणाचे स्वरूप आलेले असते. यामध्ये गैरवर्तूणुकीमुळे अनेकदा काही आमदारांचे निलंबन करावे लागते. मग पुन्हा निलंबन कसे नियमबाह्य आहे, विरोधी आमदारांचे निलंबन करून सरकार कसा जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे, यासाठी पुन्हा सरकारविरोधात निदर्शने, घोषणाबाजी केली जाते. जनतेचे प्रश्न राहिले बाजूला एकमेकांची उणीधुणी काढण्यातच अधिवेशनाचे सूप वाजते.

अधिवेशनाच्या काळात सभागृहाला आलेले आखाड्याचे स्वरूप पाहता असा गोंधळ घालण्यासाठी आमदारांना आपण निवडून देतो का हा प्रश्न कोणत्याही सामान्य मतदाराला पडल्यावाचून राहात नाही. वर्षातून तीन वेळा ही अधिवेशने भरवली जातात. प्रत्येक अधिवेशनासाठी सरकार कोट्यवधी रुपये खर्च करते. कष्टकरी सामान्य जनतेच्या घामाच्या मिळकतीतून कररूपाने सरकार दरबारी जमा होणारा हा पैसा असतो. त्याचा विनियोग व्हायला नको का? सामान्य नागरिकांवर ओढवलेल्या नैसर्गिक आणि कृत्रिम संकटांवर सरकारने योग्य तो मार्ग काढावा, सामान्य जनतेच्या मूलभूत गरजा पुरवण्यात येणाऱ्या अडथळ्यांवर उपाययोजना काढाव्यात, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, राज्यात कायदा आणि सुव्यवस्था यांचे पालन व्हावे. स्त्रियांचे रक्षण व्हावे, सरकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचाव्यात, आरोग्य व्यवस्थेबाबत सुसूत्रता असावी, एखाद्या गंभीर मुद्याबाबत स्वतंत्र कायदा करण्याची आवश्यकता असल्यास त्याबाबत विचारविनिमय घडवून आणणे, प्रचलित कायद्यात काही सुधारणा करायची असल्यास त्यावर सविस्तर अभ्यास करणे आणि या सर्वांच्या सुयोग्य नियोजनासाठी एकमेकांची मते जाणून घेणे यासाठी अधिवेशन ही संधी असते मात्र या संधीकडे सरकारला नामोहरम करण्याची पर्वणी म्हणून पहिले जात आहे. हे केवळ राज्यात घडते असे नव्हे. संसदेच्या प्रत्येक अधिवेशन काळातही हीच प्रथा राबवली जाते. गेल्या काही वर्षांतील या अधिवेशनांची फलश्रुती पाहता ती नगण्यच आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सभागृहातील गोंधळ थांबवताना आणि आमदारांना शिस्तीचे धडे देताना सभागृहाच्या अध्यक्षांचा कस लागतो, त्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो, काहीवेळा तर गोंधळ थांबवण्यासाठी पोलिसांनाही पाचारण करावे लागते. यापुढेही अधिवेशन काळात हेच घडणार असेल तर ही खर्चिक अधिवेशने हवीत तरी कशाला ?

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

### सनबर्न फेस्टिवल मुंबईत नको...

मुंबई सारख्या औद्योगिक राजधानी असलेल्या ठिकाणी सनबर्न फेस्टिवल असणे, ही मुंबईला अमेरिकेच्या लास वेगास सारखे करण्याचा प्रयत्न तर नाही ना? असा यक्ष प्रश्न सर्वसामान्य जनतेच्या मनात आहे. २००७ सालापासून हा फेस्टिवल मुख्यत्वेकरून गोवा येथे आयोजित करण्यात आलेला आहे. यावर्षी तो शिवडी मुंबई येथे आहे. यात विदेशी गाणी, पॉप संगीत यावर नाचणारी तरुण मुले असतात. त्यानंतर त्यातील काही मुले ही नशा म्हणून दारू आणि अमली पदार्थ याचे सेवन करतात. आपली काही तरुण मुले अयोग्य मार्गावर लागली आहेत आणि या सारखे होणाऱ्या कार्यक्रमामुळे त्याला खतपाणी घातले जाईल अशी भीती वाटते.

अशा कार्यक्रमातून सरकारला खूप महसूल मिळत असेल पण खरच या कार्यक्रमाची मुंबईत गरज आहे का? हा विचार झाला पाहिजे. नको असे कार्यक्रम मुंबईत...परदेशी संकृतीचे अंधानुकरण थांबवले पाहिजे हा कार्यक्रम आणि असे सर्व कार्यक्रम यांना भारतात बंदी केली पाहिजे. असे झाले नाही तर आपणही लास वेगास सारखे चुकीच्या पद्धतीने प्रसिद्ध होऊ आणि यातून आपल्या संस्कृतीचा नाश अटळ आहे.

**श्री आल्हाद माळगांवकर पनवेल**

सिंधुदुर्ग समाचारचा आजचा अंक छान जमला आहे. अंकाचे मास्टहेड सुंदर आहे. एकूण मांडणी, रंगसंगती आणि समर्पक चित्रे यामुळे अंक आकर्षक वाटतो. सोबत तो वाचनीयही आहेच. या सर्व बाबींमुळे अंक अर्थातच संग्राह्यही आहेच.

**– वाचक**

आजचा दै. सिंधुदुर्ग समाचार रविवार पुरवणी अंक खूपच रंगीन आणि आकर्षक झाला आहे. अंकातील अंतरंगाची मांडणी खूपच चित्तवेधक झाली आहे. दै.सिंधुदुर्ग समाचार अंकाच्या भावी तेजोमय व दैदीप्यमय वाटचालीसाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा!

**–शिरबंदे सर, दापोली.**

सुंदर आणि सुटसुटीत मांडणी.. योग्य ठिकाणी सुंदर कलात्मक फॉण्ड्स.. खूपच छान

---

## दिनविशेष — आंतरराष्ट्रीय पर्वत दिवस

# डोंगर वाचवा, भविष्य वाचवा!

**पद्मा भेलके**

**११ डिसेंबर** हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय पर्वत दिवस म्हणून पाळला जातो. पर्वत म्हणजे पृथ्वीची हाडांची चौकट, निसर्गाच्या संरक्षणाची भिंत आणि हवामान संतुलनाची नैसर्गिक प्रयोगशाळा. मानवजातीच्या अस्तित्वात पर्वतांचा वाटा इतका मोठा आहे की ते नसतील तर पाणी, हवा, शेती, औषधी वनस्पती, जैवविविधता, जंगल, नद्या, निसर्गसंतुलन आणि मानवी संस्कृती हे सर्व एका क्षणी कोलमडून पडेल. म्हणूनच संयुक्त राष्ट्रांनी पर्वतांसाठी जागृती निर्माण करण्यासाठी हा दिवस विशेषत्वाने घोषित केला. परंतु आज जगभरातील पर्वतरांगांवर संकटाचे ढग घोंघावत आहेत आणि महाराष्ट्रातील सातारा जिल्हाही या संकटाला अपवाद नाही.

सातारा ही सात डोंगरांनी वेढलेली नगरी. या सात डोंगरांपासूनच शहराला ‘‘सात तारे’’ किंवा “Seven Stars” ही ऐतिहासिक ओळख मिळाली. अजिंक्यतारा, जरांदेशन्वर, यवतेश्वर, किटलिचा डोंगर, सज्जनगड, पेढ्याचा भैरोबा आणि नकडीचा डोंगर हे सातही डोंगर साताऱ्याच्या ओळखीचा, इतिहासाचा आणि संस्कृतीचा अविभाज्य अंग आहेत. या डोंगरांवरून दिसणारा निसर्ग, त्यातील इतिहासाचे प्राणवायू, धार्मिक स्थळांची शांतता आणि परिसरातील जैवविविधता हे सर्व मिळून साताऱ्याला एक विशिष्ट वैशिष्ट्य देते. सज्जनगडावर समर्थ रामदास स्वामींची पवित्र भूमी, अजिंक्यताराचा ऐतिहासिक किल्ला, यवतेश्वरची समृद्ध वनश्री आणि इतर डोंगरांची विविध जैवविविधता यांनी सातारा प्रदेश ही एक नैसर्गिक आणि सांस्कृतिक संपन्नता असलेली भूमी बनवली आहे. परंतु गेल्या काही वर्षांपासून या सर्व डोंगरांवर अनियंत्रित उत्खननामुळे भीषण पर्यावरणीय संकट निर्माण झाले आहे.

सातारा-मुंबई महामार्गाला आणि आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर उभे राहिलेले स्टोन क्रशर प्लांट्स आज पर्वतांची मुळे खणून काढत आहेत. दगड उत्खनन, डायनामाइट ब्लास्टिंग, मुरूम उत्खनन आणि वाहतुकीसाठी अविरत धावणाऱ्या ट्रकांच्या लोंढ्यांमुळे संपूर्ण भौगोलिक रचना उद्ध्वस्त होत आहे. अनेक ठिकाणी डोंगरांचे संपूर्ण पोट खोदून काढले गेले असून काही डोंगर तर नकाशावरूनच अदृश्य होण्याच्या मार्गावर आहेत. उत्खननामुळे निर्माण होणाऱ्या सततच्या धूळकणांमुळे हवा प्रदूषित झाली आहे आणि जवळील गावांतील झरे, ओढे आणि पाणवठे गढूळ झाले आहेत. भूजल पातळी धोकादायकरीत्या खाली गेली आहे, ज्याचा फटका शेतीला, पिण्याच्या पाण्याला आणि स्थानिक जीवनशैलीला बसतो आहे. एकेकाळी हिरव्यागार असलेली ही टेकाडे आज मोठ्या जखमांनी विद्रूप झालेली दिसतात.

डोंगरांची धुळधाण करणे म्हणजे फक्त निसर्गसृष्टीची हानी नव्हेय तर निसर्गाच्या संपूर्ण पर्यावरणीय साखळीचे विघटन आहे. पर्वत हे पावसाचे पाणी शोषून ठेवतात आणि नद्यांना स्रोत पुरवतात. पर्वतांच्या रक्षणाशिवाय पावसाचे पाणी वाहून जाते, झरे आटतात आणि नदीचे उगमक्षेत्र कमकुवत होते. परिणामी दुष्काळाचे प्रमाण वाढते. जमिनीची धूप, भूस्खलन, पूरप्रवणता आणि उष्णतेचा प्रकोप वाढतो.



डोंगर कापल्याने वाऱ्याचा वेग बदलतो, पावसाचे प्रमाण अनियमित होते आणि हवामानाचे चक्र असंतुलित होते. आज पुणे, सातारा, कोल्हापूर या सर्व परिसरात हवामानातील अचानक बदल, अल्पवेळात होणारा मुसळधार पाऊस किंवा लांब काळ राहणारे दुष्काळी दिवस हे या अनियंत्रित हस्तक्षेपाचे परिणाम आहेत.

त्याशिवाय पर्वत म्हणजे जैवविविधतेचे खरे घर. पक्षी, वन्य प्राणी, औषधी वनस्पती, दुर्मिळ वृक्षप्रजाता यांचा अधिवास पर्वतरांगांमध्ये असतो. पर्वतांचे पोट खोदण्यात आल्याने आज अनेक प्रजातींचे नैसर्गिक अधिवास नष्ट होत आहेत. फुलपाखरांपासून ते वन्य प्राण्यांपर्यंत अनेक जीवांचा श्वास रोखला जात आहे. पक्ष्यांच्या स्थलांतराचे मार्ग बदलले आहेत. औषधी वनस्पतींच्या नष्टतेमुळे भविष्यातील आयुर्वेदिक संशोधनालाही अडथळा निर्माण होऊ शकतो.

इतिहास आणि परंपरेशी जोडलेली साताऱ्याची पर्वतरांग आज अशा अवस्थेत उभी आहे की स्थानिक नागरिकांनीही अनेक डोंगर लहान होत गेल्याचे प्रत्यक्ष अनुभवले आहे. काही डोंगर इतके सपाट झाले आहेत की त्यांचे पूर्वीचे स्वरूप ओळखू न येण्याइतपत बदलले आहे. हे केवळ पर्यावरणीय अपराध नसून सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचा गंभीर विनाश आहे.

या पार्श्वभूमीवर, महात्मा गांधींच्या ‘खादी’च्या संकल्पनेचे महत्त्व आज अधिक प्रकर्षाने जाणवते. खादी म्हणजे शाश्वत जीवनशैलीचा, नैसर्गिकतेचा आणि पर्यावरणपूरकतेचा संदेश. नैसर्गिक तंतूपासून, ऊर्जेची नासाडी न करता आणि प्रदूषण न घडवता तयार होणारी खादी ही ग्रामीण भागातील महिलांसाठी रोजगाराचे साधन तर आहेचय पण निसर्गाशी अनुरूप राहण्याचा मार्गही आहे. आज पर्वतांचे रक्षण करायचे असेल तर शाश्वत जीवनशैली स्वीकारणे, पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर, कमी प्रदूषणाचे उत्पादन आणि पाण्याचा योग्य वापर हे सर्व महत्त्वाचे ठरते. खादीचा संदेश आपल्याला सोप्या शब्दांत सांगतो की निसर्गाशी एकरूप राहणे हेच मानवजातीचे खरे कल्याण आहे. ‘‘खादी परिधान करा, निसर्ग वाचवा, डोंगर वाचवा’’ हा संदेश आज अत्यंत सार्थ वाटतो.

आंतरराष्ट्रीय पर्वत दिवस हे पर्वतांच्या संरक्षणाची आठवण करून देण्यापुरते मर्यादित नसावे. हा दिवस हा धोक्यात आलेल्या पर्वत परिसंस्थांकडे पाहण्याचा आणि त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचा क्षण आहे. बेकायदेशीर उत्खननावर बंदी, परवाना प्रणालीत पारदर्शकता, पर्यावरणीय नियमांचे काटेकोर पालन, पोटतिडकीने प्रयत्न करणाऱ्या स्थानिक नागरिकांचा सहभाग, शाळांमधून जनजागृती, पर्वत परिसरात वृक्षलागवड आणि पर्वतरक्षणासाठी विशेष निधी या सगळ्या उपाययोजना तातडीने राबवणे गरजेचे आहे. पर्वत संरक्षित करण्यासाठी फक्त शासनाचे नव्हे, तर प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. गावागावात पर्वत संरक्षण समित्या स्थापन होणे, ग्रामसभेतून बेकायदेशीर उत्खननाविरोधात ठराव मंजूर होणे आणि पर्यावरणप्रेमी लोकांनी सतत दबावगट म्हणून मेहनत करणे या लोकशक्तीच्या प्रयत्नांची आवश्यकता आहे.

डोंगर म्हणजे फक्त दगड–मातीचे ढिगारे नव्हेत. ते इतिहासाचे साक्षीदार आहेत, सांस्कृतिक परंपरेचे आधारस्थान आहेत, निसर्गाचे संतुलक आहेत आणि पुढील पिढ्यांसाठी आयुष्य देणारे जलस्रोत आहेत. साताऱ्याची सर्वांगीण ओळख ह्याच पर्वतरांगांवर उभी आहे. जर हेच डोंगर नष्ट झाले, तर साताऱ्याची संस्कृती, हवामान, नद्या, शेती आणि पर्यावरण सर्व काही धोक्यात येईल. हे आपल्यापैकी प्रत्येकाने गांभीर्याने समजून घ्यायला हवे.

पर्यावरणाची जपणूक ही भविष्याची गुंतवणूक असते. डोंगरांचे संरक्षण म्हणजे पाण्याचे रक्षण, जमिनीचे रक्षण, हवामानाचे रक्षण, आरोग्याचे रक्षण- म्हणजेच भविष्याचे रक्षण. आजची पिढी जर जागरूक झाली नाही, तर उद्याची पिढी निसर्गाचा विध्वंस अनुभवेल. म्हणूनच प्रत्येकाने सजग राहून पर्यावरणपूरक जीवनपद्धतीचा अवलंब करणे आणि पर्वतांच्या संरक्षणासाठी योगदान देणे अत्यावश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय पर्वत दिन आपल्याला एकच शिकवण देतोकृडोंगर वाचवा, म्हणजे भविष्य वाचवा. आज जे पर्वत जिवंत आहेत, त्यांचे रक्षण आजच केले पाहिजे, अन्यथा उद्या ते फक्त इतिहासाच्या पानांत उरतील. साताऱ्याचे डोंगर उभे राहिले, तरच साताऱ्याची ओळख उभी राहील. निसर्गाची कदर केली तरच निसर्ग आपल्याला जगवेल. म्हणून आज आपण सर्वांनी मिळून एकच संकल्प करुया ‘‘डोंगर वाचवा म्हणजे भविष्य वाचवा.’’

---

## राशि भविष्य

**आजचा सुविचार:** *कठीण काळात हार मानू नका कारण सर्वात सुंदर गोष्ट संघर्षातूनच निर्माण होते.*

**मेष:** अनपेक्षित संधी मिळेल, आत्मविश्वास वाढेल. कुटुंबातील ताण आज कमी होईल.

**वृषभ:** आर्थिक व्यवहारांमध्ये सावध रहा. नवी जबाबदारी स्वीकारावी लागेल.

**मिथुन:** प्रवासयोग अनुकूलय कामात गती येईल. मित्रांकडून मदत मिळेल.

**कर्क:** मानसिक तणाव दूर होईलय निर्णय अचूक ठरतील. घरात मंगलकार्याची चाहूल.

**सिंह:** महत्त्वाचे काम आज लवकर पूर्ण होतील. मान–सन्मान वाढण्याची शक्यता.

**कन्या:** आरोग्याकडे लक्ष द्या. कामाच्या ठिकाणी गैरसमज टाळावेत.

**तुला:** आर्थिक स्थैर्य वाढेलय गुंतवणुकीत फायदा. नात्यांमध्ये गोडवा येईल.

**वृश्चिक:** कामात अडथळे येतील पण धीर सोडू नका. अचानक खर्च वाढू शकतो.

**धनु:** नवीन करार आणि कामासाठी शुभ दिवस. प्रवास यशस्वी ठरेल.

**मकर:** जुन्या अडचणी दूर होतील. वरिष्ठांकडून कौतुक मिळण्याची शक्यता.

**कुंभ:** भावनिक स्थैर्य आवश्यकय वाद टाळा. आर्थिक बाबींमध्ये लक्ष द्या.

**मीन:** शुभकार्य घडेलय मन प्रसन्न राहील. करिअरमध्ये नवीन दिशा मिळेल.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक रूपाली रवीन डांगे (अॅड.रूपाली मुकुंद कदम) (बी.एस.एल, एल.एल.बी, एमसीए) ४३७११/८५ यांनी मे.विक्रम मुद्रणालय, १०३ मेन रोड, कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग ४१६६०२ येथे छापून १०३ मेन रोड, कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग येथून प्रसिद्ध केले. मुख्य कार्यालय : दैनिक सिंधुदुर्ग समाचार, नरडवे चौक समोर, कणकवली जि.सिंधुदुर्ग वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही.
मालक, प्रकाशक आणि संपादक रूपाली रवीन डांगे (अॅड.रूपाली मुकुंद कदम) – ९८२२९७९७३२, कार्यालय संपर्क क्रमांक : ९८२२९७९७३२ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.) संस्थापक कै.मुकुंद हरी कदम (एम.ए,एल.एल.बी)
This 'Daily Sindhudurg Samachar', Owner, Publisher by Rupali Ravin Dange (Adv.Rupali Mukund Kadam) BSL, LLB printed at Ms.Vikram Mudranalay, 103 Main Road, kankavli, Dist - Sindhudurg 416602, Published from 103 Main Road, kankavli, Dist - Sindhudurg 416602. The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper.
Owner, Publisher, Printer, Editor Rupali Ravin Dange (Adv.Rupali Mukund Kadam) Contact No. - 9822979732, Office Contact No. - 9822979732 (Responsible for selection of news under PRB ct.)
Email: sindhudurg.samachar@gmail.com Website: www.sindhudurgsamachar.in Facebook: sindhudurgsamacharlive, samacharhub Instagram: sindhudurgsamachar youtube: sindhudurgsamachar

## थोडक्यात

### महाराष्ट्रात २०२६ साठी २४ सार्वजनिक सुट्ट्यांची घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने २०२६ या वर्षासाठी राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांसाठी २४ सार्वजनिक सुट्ट्या जाहीर केल्या आहेत. याशिवाय भाऊबीज (११ नोव्हेंबर २०२६, बुधवार) या दिवशी अतिरिक्त सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. याबाबतची अधिसूचना सामान्य प्रशासन विभागाने जारी केली असून, या सुट्ट्यांनुसार शासकीय कार्यालयांचे वार्षिक दिनदर्शक अंतिम करण्यात आले आहे.

### फळपीक विमा योजनेची मुदत १५ डिसेंबरपर्यंत वाढ -दत्तात्रय भरणे

**नागपूर । प्रतिनिधी**

आंबा, संत्रा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेत नोंदणी व पडताळणी प्रक्रियेत झालेल्या विलंबामुळे अनेक शेतकऱ्यांना योजनेत सहभाग घेता आला नव्हता. या पार्श्वभूमीवर अधिसूचित जिल्ह्यांसाठी नोंदणीची अंतिम मुदत १५ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्यात आल्याची माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. राज्य शासनाने केंद्र सरकारकडे मुदतवाढीसाठी पत्रव्यवहार केला होता. त्यानुसार बजाज अलियांझ जनरल इन्शुरन्स आणि सेंट्रल जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड यांनी मुदतवाढ मंजूर केली आहे. तसेच युनिव्हर्सल सोंम्पो जनरल इन्शुरन्स यांनी छब्ब पोर्टल सुरु झाल्यानंतर अतिरिक्त सात दिवसांची मुदतवाढ देण्याची तयारी दर्शवली आहे. मात्र AIC ऑफ इंडिया लिमिटेड यांनी त्यांच्या क्लस्टरमधील जिल्ह्यांना मुदतवाढ देण्यास नकार दिल्याचेही भरणे यांनी स्पष्ट केले. केंद्र सरकारने रब्बी हंगाम २०२५–२६ साठी अधिसूचित आंबा, संत्रा व काजू पिक उत्पादक कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांच्या नोंदणीला मुदतवाढ दिली आहे. वाढीव मुदतीत केंद्र सरकारचा प्रीमियम वाटा कायम राहणार असून, नैतिक जोखीम टाळण्यासाठी कडक मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले जाईल, अशीही मंजुरी केंद्राकडून देण्यात आली आहे, असे मंत्री भरणे यांनी सांगितले.भरणे पुढे म्हणाले, ''जास्तीत जास्त पात्र शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी व्हावे. त्यामुळे सर्व नोंदणी केंद्रांना तसेच माध्यमांना ही माहिती तात्काळ पोहोचवण्याचे निर्देश दिले आहेत.''

### प्राध्यापक भरती प्रक्रियेला गती, मंत्री चंद्रकांत पाटील यांची विधान परिषदेत माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांमधील प्राध्यापक भरतीचा प्रश्न गेल्या अनेक महिन्यांपासून अनिर्णित अवस्थेत अडकलेला असताना, लवकरच या प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता आहे. विधान परिषदेत मंगळवारी (दि. ९) उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी येणाऱ्या महिन्याभरात प्राध्यापक भरतीसंदर्भातील आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असे स्पष्ट केले. त्यामुळे प्राध्यापक पदांच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे. विधान परिषद सदस्य जयंत आजगावकर यांनी वॅ ब्स प्रक्रियेसह महाविद्यालयातील रिक्त प्राध्यापक पदांच्या भरतीबाबत प्रश्न उपस्थित केला. त्यावर स्पष्टीकरण देताना पाटील म्हणाले की, महाविद्यालयांमधील रिक्त पदांच्या भरतीसाठी वित्त विभागाने मंजुरी दिली असून, आता महाविद्यालयनिहाय विद्यार्थी संख्येचा आढावा घेऊन विषयानुसार पदवाटपाची प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया पुढील एका महिन्यात पूर्ण करण्यात येणार आहे. विद्यापीठांमधील ७५० प्राध्यापकांची भरतीही निकषांवरील बदलांमुळे रखडली आहे. माजी राज्यपालांनी ठरवलेल्या ७०–३० या सूत्राऐवजी सध्याचे राज्यपाल ६०–४० या नव्या सूत्रावर सहमती दर्शवत आहेत. तथापि, नवीन भरतीसाठी ५०–५० चे सूत्र लागू करण्याचा सरकारचा प्रयत्न असून याबाबत लवकरच अंतिम निर्णय होईल, असेही पाटील यांनी स्पष्ट केले.

# शेतकरी आत्महत्यांच्या छायेत सरकारची व्हीव्हीआयपी लक्झरीवर कोटींची उधळपट्टी

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात शेतकऱ्यांचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना, राज्य सरकारने अति महत्त्वाच्या व्यक्तींच्या हवाई प्रवासासाठी तब्बल रु. १४३ कोटींची अतिरिक्त तरतूद केल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या निर्णयावर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी जोरदार शब्दांत हल्ला चढवला आहे.

रोहित पवार म्हणाले की, २०१७ मधील पात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी निधी नाही, कृषी समृद्धी योजना बंद पडली आहे, हेक्टरी ५० हजार मदत मिळत नाहीय पण VVIP लक्झरी प्रवासासाठी कोट्यवधींचा निधी सहज उपलब्ध होतो, हे सरकारच्या प्राधान्यक्रमाचे धक्कादायक उदाहरण आहे.

ते पुढे म्हणाले की, ''दररोज राज्यात सरासरी आठ शेतकरी आत्महत्या करत आहेत. मनरेगा बिलं थकल्याने शेतकऱ्यांना सावकारांकडून कर्ज घ्यावं लागतंय. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्त्या महिनोनमहिने रखडलेल्या आहेत. बिलं न मिळाल्याने अनेक युवा कंत्राटदारांना आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घ्यावा लागत आहे. सारथी, बार्टी, महाज्योती सारख्या वंचित समाजाच्या संस्थांना पुरेसा निधी मिळत नाही. अशा परिस्थितीत सरकारची ही उधळपट्टी म्हणजे सर्वसामान्यांच्या प्रश्नांबद्दलची पूर्णपणे असंवेदनशील भूमिका आहे.''




राज्य शासनाच्या पुरवणी मागण्यांमध्ये नमूद करण्यात आले आहे की, VVIP व्यक्तींच्या हवाई प्रवासासाठी तसेच संबंधित अनुषंगिक खर्चांसाठी रु. १४३ कोटी (रु. १,४३,००,००,०००) इतक्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्याचे ठरविण्यात आले आहे. रोहित पवारांनी सवाल केला की,''शेतकरी, युवक, विद्यार्थी, मागासवर्गीय संस्था - सर्वांना निधीअभावी अडचणींचा सामना करावा लागत असताना VVIP प्रवासाला इतकी मोठी रक्कम का? हे सरकार खरंच कोणासाठी काम करतं? सर्वसामान्यांसाठी की निवडक सत्ताधाऱ्यांच्या मौजमजेकरिता?''


शेतकरी आत्महत्यांचा वाढता आकडा, पावसाचे अनिश्चित स्वरूप, कर्जबाजारीपण आणि योजनांमध्ये निधीअभावी निर्माण झालेली आर्थिक कोंडी या सर्व पार्श्वभूमीवर सरकारचा हा निर्णय अधिक वादग्रस्त ठरत आहे.

विरोधकांच्या मते, सरकारचे प्राधान्यक्रम चुकीचे आहेत. शेतकऱ्यांना बळ देणे, मनरेगा व शिष्यवृत्तीची थकबाकी देणे, पायाभूत सुविधा आणि समाजकल्याणासाठी निधी उपलब्ध करून देणे या अपेक्षित क्षेत्रांपेक्षा VVIP प्रवासावर खर्च करण्याचा निर्णय जनतेच्या मनात नाराजी निर्माण करणारा आहे. दरम्यान, सरकारकडून अद्याप या टीकेवर अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही. मात्र विरोधकांचा सुर पाहता, आगामी अधिवेशनात हा मुद्दा जोरदारपणे उपस्थित राहणार, हे निश्चित. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी, विद्यार्थी-युवकांच्या अडचणी दूर करण्यासाठी निधी नसताना, VVIP प्रवासासाठी कोट्यवधी उपलब्ध. या विरोधाभासावरून सरकारचे भूमिकेतील प्राधान्यक्रम नेमके कुठे आहेत, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## पुरंदर विमानतळ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांवर प्रशासनाशी सकारात्मक चर्चा

**पुरंदर । प्रतिनिधी**

पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांशी जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने सकारात्मक व रचनात्मक चर्चा केली. प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्या गांभीर्याने घेतल्या जातील, असे आश्वासन प्रशासनाने या बैठकीत दिले.




शेतकरी प्रतिनिधींनी बैठकीदरम्यान योग्य भरपाई, निवासी भूखंड, प्रकल्पात नोकरी, पुनर्वसनाची ठोस हमी आणि कर सवलती या महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रशासनाचे लक्ष वेधले. त्यांनी मागण्यांसोबत त्यांच्या अडचणी, भविष्यातील अनिश्चितता आणि प्रकल्पाच्या परिणामांची माहितीही अधिकाऱ्यांसमोर मांडली.जिल्हाधिकारी दुडी यांनी शेतकऱ्यांना खात्री दिली की, ''राज्य सरकार प्रकल्पग्रस्तांच्या पाठीशी आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच शेतकरी प्रतिनिधींशी प्रत्यक्ष चर्चा करतील आणि पुढील उपाययोजना ठरवतील.''

प्रशासनातील अधिकाऱ्यांनीही प्रकल्पामुळे प्रभावित कुटुंबांना पूर्ण पारदर्शकता, खुली माहिती, तसेच कौशल्य विकास व रोजगारसंबंधी मदत देण्याचे आश्वासन दिले. प्रकल्प प्रगतीच्या सर्व टप्प्यांमध्ये शेतकऱ्यांशी संवाद वाढवण्याचे आणि त्यांचे हित जपण्याचे आश्वासन बैठकीतून देण्यात आले. पुरंदर विमानतळ प्रकल्पावरून अनेक वर्षे ताणलेला प्रश्न सोडवण्यासाठी ही बैठक महत्त्वाची पायरी मानली जात असून, पुढील भेटीत नेमक्या उपाययोजनांबाबत स्पष्ट दिशा मिळण्याची शक्यता आहे.

## नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी संसदेत जोरदार निदर्शने

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

संसद भवनाच्या आवारात बुधवार, १० डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्रातील खासदारांकडून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला राष्ट्रीय नेते स्व. दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी तीव्र आणि जोरदार निदर्शने करण्यात आली. खासदार बाळ्या मामा यांच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनात महाराष्ट्रातील अनेक लोकप्रतिनिधींनी एकत्र येत भूमिपुत्रांच्या सन्मानासाठी ठाम आवाज उठवला.

या आंदोलना दरम्यान खासदारांनी स्पष्ट केले की, नवी मुंबई विमानतळाच्या बांधकामासाठी हजारो स्थानिकांनी जमीन दिली, नोकऱ्या आणि पुनर्वसनाचे आश्वासन मान्य केले, त्याग केला. त्यामुळे या विमानतळाला मूळ भूमिपुत्रांचे नेते व जननायक दि. बा. पाटील यांचे नाव देणे



हा न्याय व सन्मानाचा प्रश्न आहे.

**खासदार बाळ्या मामा म्हणाले,** ''भूमिपुत्रांच्या हक्कांचा आणि सन्मानाचा हा लढा अनेक वर्षांपासून सुरू आहे. आम्ही शांततेने पण ठामपणे केंद्र सरकारसमोर आमची भूमिका मांडत आहोत. आजच्या निदर्शनांतून पुन्हा एकदा आम्ही स्पष्ट केले की ही मागणी केवळ राजकीय नाही, तर भावनिक आणि ऐतिहासिक न्यायाशी जोडलेली आहे.'' संसद भवनातील या निदर्शनांमुळे या मुद्याला पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर महत्व प्राप्त झाले असून, पुढील काही दिवसांत या विषयावर केंद्र सरकार काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## प्रतिभासंपन्न संगीतकार सतीशचंद्र दत्तात्रय मोरे यांचे २ डिसेंबर २०२५ च्या मध्यरात्री प्रदीर्घ आजाराने निधन!

**मुंबई । प्रतिनिधी**


ज्येष्ठ आणि हरहुन्नरी संगीतकार सतीशचंद्र दत्तात्रय मोरे यांचे प्रदीर्घ आजाराने २ डिसेंबर २०२५ रोजी मध्यरात्री माउंट मेरी चर्चजवळील शांती आवेदना येथे निधन झाले. ते ५६ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाची माहिती त्यांच्या स्नेही तृप्ती करलकर यांनी दिली. संवेदनशील, निस्वार्थी आणि दिलखुलास स्वभावामुळे संगीतविश्वात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या या प्रतिभावंताच्या जाण्याने संगीत क्षेत्रात शोककळा पसरली आहे.



विद्रोही कवी पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या प्रभावी कवितांना ताकदीने सुरावट देण्याची अनोखी क्षमता सतीशचंद्र मोरे यांच्या कार्याची ओळख ठरली. त्यांनी वैशाली सामंत, अवधूत गुप्ते, साधना सरगम, सुरेश वाडकर, कैलाश खेर, शान, शंकर महादेवन, स्वरूप खान, आनंदी जोशी, नेहा कक्कर यांसारख्या अनेक नामवंत गायकांसोबत काम केले होते. मालिकांची शीर्षकगीते, जाहिरातींच्या जिंगल्स, तसेच स्वतंत्र संगीत रचना अशा विविध माध्यमांमध्ये ते सतत सक्रिय होते. संगीताची ओढ बालपणापासूनच असली तरी सुरुवातीला त्यांनी अपना बँक येथे नोकरी केली. नंतर टाटा कंपनीकडूनही रोजगाराची संधी मिळाली होतीय पण संगीताची ध्यासाने त्यांनी हा मार्ग न स्वीकारता पूर्णवेळ संगीतकार होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या वडिलांना हार्मोनियम आणि मेंडोलिन वादनाची आवड होती हाच संस्कार मनात बाळगत सतीशचंद्र यांनीही संगीताची वाट निवडली.

वडाळ्यातील ज्ञानेश्वर विद्यालयात ते काही काळ संगीत शिक्षक आणि कार्यक्रम संचालक म्हणून कार्यरत होते. त्यानंतर त्यांनी रचनाकार म्हणून स्वतंत्र प्रवासाला सुरुवात केली. संघर्ष, जिद्द आणि सृजनशीलतेच्या जोरावर त्यांनी संगीतविश्वात मानाचे स्थान मिळवले. सतीशचंद्र मोरे यांचे निधन म्हणजे एका बहुआयामी, अभ्यासू आणि संवेदनशील कलाकाराची पोकळी ज्याची भर पडणं कठीण आहे. संगीतविश्व, सहकारी कलाकार आणि चाहत्यांकडून त्यांच्या आठवणींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली जात आहे.

## गरजू गरोदर महिलांसाठी 'गरीब' योजनेअंतर्गत विनामूल्य सोनोग्राफी व तपासणी सेवा सुरू


जय गावदरी! जय कणसरी! जय धरतरी!
आदिवासी एकता मित्र मंडळ
श्री.दामोदर मंगल कासट उपाध्यक्ष | श्री.संतोष शिवराम जनाठे संस्थापक अध्यक्ष | श्री.मंगेश नवशा गोड खजिनदार
मुख्य कार्यालय-बिरसायत,मनोर,ता.जि.पालघर. संपर्क :- 7030719758
नोंदणी क्रमांक-एफ-७७१४ (पालघर)
जावक क्र : 92/2025 दिनांक : 08/12/2025
गरीब-गरजू गरोदर महीलांसाठी विनामुल्य सोनोग्राफी व तपासणी सेवा योजना.
लाभार्थी नियम

पालघर । प्रतिनिधी

आदिवासी भागातील गर्भवती महिलांना आरोग्यसेवा अधिक सुलभ करण्यासाठी आदिवासी एकता मित्र मंडळ, बिरसायत भवन, मनोर (ता. व जिल्हा पालघर) यांच्या वतीने गरीब दृ गरजू गरोदर महिलांसाठी विनामूल्य सोनोग्राफी व तपासणी सेवा योजना सुरू करण्यात आली आहे. आर्थिक अडचणींमुळे वेळेवर तपासणी न करणाऱ्या महिलांसाठी ही योजना मोठा दिलासा ठरणार आहे. संस्थेच्या माहितीनुसार, या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या गरीब आणि गरजू गर्भवती महिलांनी पत्रात नमूद केलेली आवश्यक कागदपत्रे घेऊन बिरसायत भवन, मनोर येथे संपर्क साधावा व संबंधित फॉर्म भरावा.फॉर्म भरल्यानंतर लाभार्थी महिलांना विशाल सोनोग्राफी सेंटर, मनोर येथे विनामूल्य सोनोग्राफीची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच, आवश्यकता भासल्यास आस्था हॉस्पिटल, मनोर येथे विविध तपासण्यांसाठीही विनामूल्य सेवा मिळणार आहे. बिरसायत परिवार आणि आदिवासी एकता मित्र मंडळाने ही योजना सुरु करताना सांगितले की, ग्रामीण आणि आदिवासी भागातील अनेक गरोदर महिलांना आर्थिक मर्यादांमुळे तातडीच्या आणि आवश्यक तपासण्या करता येत नाहीत. मातामुलांचे आरोग्य जपण्यासाठी ही योजना अत्यंत महत्त्वाची ठरेल. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत संस्थेचे आभार मानले असून, अधिकाधिक महिलांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त गौरवशाली वाटचाल ग्रंथाचे राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन



**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय गणराज्याच्या ७५व्या वर्षपूर्तीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानसभेतील भाषणांवर आधारित 'भारतीय संविधान गौरवशाली अमृतमहोत्सवी वाटचाल' या महत्वाच्या ग्रंथाचे प्रकाशन राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते आज करण्यात आले. भारतीय लोकशाहीची वाटचाल, संविधानाची मूल्ये आणि स्वातंत्र्योत्तर भारताच्या विकासाचा प्रवास याचे सखोल दर्शन घडवणारा हा ग्रंथ विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर प्रकाशित झाला. प्रकाशन कार्यक्रमाला विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील तसेच मंत्रिमंडळातील सदस्य आणि विधिमंडळाचे अनेक मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना मान्यवरांनी भारतीय संविधानाच्या सामर्थ्याची, लोकशाहीच्या चिरकालीन परंपरेची आणि या मूल्यांना बळकटी देण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिका व विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. स्वातंत्र्यानंतरच्या भारताच्या प्रगतीचा व लोकशाही संस्थांच्या दृढीकरणाचा उल्लेख या ग्रंथात प्रभावीपणे करण्यात आल्याचेही सांगण्यात आले. संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित झालेला हा ग्रंथ विधिमंडळ सदस्यांसह संशोधक, अभ्यासक आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात राज्यात गारठा अधिक वाढला अनेक जिल्ह्यांत पारा १० अंशांच्या खाली

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यातच थंडीचा कडाका जाणवू लागला आहे. हवेतील वाढत्या गारव्यामुळे नागरिकांना दिवसाही उबदार कपड्यांचा आधार घ्यावा लागत आहे. मंगळवार, ९ डिसेंबर रोजी राज्यातील बहुतांश भागांचे किमान तापमान घसरले असून, अहिल्यानगर येथे सर्वात कमी ७.४ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले आहे. येत्या काही दिवसांत तापमानात आणखी घट होण्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविला आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे महाराष्ट्रात गारठा वाढला असून, विदर्भातील गोंदिया, नागपूर, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये किमान तापमान ९ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले आहे. राज्यभर ठिकठिकाणी रस्त्यांलगत शेकोट्या पेटू लागल्या असून, दिवसभर जाणवणाऱ्या गारव्यामुळे सर्दी–खोकल्याचे प्रमाण वाढल्याची नोंद आहे.सकाळी फिरायला जाणारे नागरिकही गारठ्यापासून बचावासाठी जाड कपडे किंवा स्वेटर घालूनच बाहेर पडत आहेत. गेल्या काही दिवसांपासून राज्यातील अनेक जिल्ह्यांत पारा १० अंश सेल्सिअसपर्यंत घसरला आहे.



मराठवाड्यातही हुडहुडी वाढली असून, छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि उस्मानाबाद येथे किमान तापमानात तब्बल २ अंशांची घट झाली आहे. पश्चिम महाराष्ट्रात पुणे, नाशिक आणि जळगाव येथे तापमान ८ ते ९ अंशपर्यंत खाली आले आहे. मुंबईत कमाल तापमान ३४ अंश तर किमान तापमान २१.७ अंश नोंदवले गेले. पुढील काही दिवस राज्यातील उत्तर–मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या भागांत कडाक्याची थंडी कायम राहण्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. रात्री आणि पहाटे थंड वारे, तर दिवसभर कोरडे हवामान राहणार आहे.

## ईटीसी केंद्रातील ओजसचे राज्यस्तरीय स्पेशल ऑलिम्पिक स्पर्धेत सुयश

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

नमुंमपाचे ईटीसी केंद्र हे नवी मुंबई शहरातील दिव्यांग मुलांच्या शिक्षण, प्रशिक्षणासाठी सातत्याने प्रयत्नशील असते. दिव्यांग मुलांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळण्यासाठी केंद्रामार्फत सातत्याने प्रयत्न केले जातात. याकरिता विविध स्तरांवर स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी दिव्यांग मुलांना प्रोत्साहन दिले जाते व सहभागासाठी प्रयत्न केला जातो. दि. ८ डिसेंबर रोजी अहिल्यानगर येथे डॉ. विठ्ठलराव विखेपाटील फाऊंडेशन आणि जनसेवा फाऊंडेशन, लोणी यांच्या संयुक्त विदयमाने संपन्न झालेल्या स्पेशल ऑलिम्पिक भारत महाराष्ट्र स्पर्धेअंतर्गत राज्यस्तरीय सायकलिंग व ज्युडो स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विळदघाट बायपास महामार्गावर दिव्यांग मुलांची विशेष सायकल स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत नवी मुंबई महानगरपालिकेच्या ईटीसी केंद्रामधील मतिमंद विभागातील कु. ओजस राहुल अडागळे या मुलाने




०५ किमीचे अंतर जलद पार करीत सायकलिंग स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविला. या स्पर्धांमध्ये मुंबई, कोल्हापूर, पुणे, नाशिक, अमरावती, रायगड, ठाणे, वाशिम, धाराशिव, सोलापूर, अहिल्यानगर अशा विविध जिल्ह्यांतील दिव्यांग मुले सहभागी झाली होती. यावेळी स्पेशल ऑलिम्पिक भारत महाराष्ट्र अध्यक्ष डॉ.सोमैय्या, जिल्हाध्यक्ष धनश्री विखे पाटील, जिल्हापरिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्यासह राज्यभरातील क्रीडा शिक्षक, पालक व दिव्यांग खेळाडू मोठया संख्येने उपस्थित होते. ओजसने मिळवलेल्या यशाबद्दल महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी अभिनंदन केले असून त्याची कामगिरी इतरांसाठी प्रेरणादायक असल्याचे सांगितले आहे. अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार व ईटीसी संचालिका डॉ. अनुराधा बाबर यांनीही ओजस अडागळेचे अभिनंदन करीत त्याला प्रोत्साहन देणाऱ्या पालकांचे तसेच ईटीसी टीमचे कौतुक केले आहे.

## थोडक्यात

### साखरपुड्याच्या आनंदावर विरजण, शिवाजी नगरमधून ६ लाखांचे दागिने लंपास, अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल

**दापोली:** घरात साखरपुड्याचा आनंद असतानाच दापोलीतील शिवाजी नगर भागात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. हातावर मेहेंदी काढण्यासाठी काढून ठेवलेले तब्बल ६ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने (पाटल्या) अज्ञात चोरटशाने लंपास केल्याचा प्रकार घडला आहे. ही पटना ७ डिसेंबर रोजी पडली असून, याप्रकरणी ९ डिसेंबर रोजी दापोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी संगिता संदेश तलाठी (वय ५१, रा. ऐश्वर्या बंगला, शिवाजी नगर, दापोली) याच्या घरी ७ डिसेंबर २०२५ रोजी साखरपुडा होता. या कार्यक्रमासाठी दुपारी ३:०० वाजता मेहेंदी काढण्यासाठी एक महिला घरी आली होती. फिर्यादी संगिता हीने मेहेंदी काढण्यासाठी आपल्या दोन्ही हातातील ६ तोळे वजनाच्या दोन सोन्याच्या पाटल्या (किंमत अंदाजे ६,००,०००/–रुपये) काढून बेडरूममधील ड्रेसिंग टेबलच्या पहिल्या ड्रॉवरमध्ये ठेवल्या होत्या. फिर्यादी या आजारी असल्याने त्यांनी औषधे घेतली होती, त्यामुळे मेहेंदी काढल्यानंतर त्या झोपी गेल्या.

**गर्दीचा फायदा घेत चोरी**

दुपारी ३:०० ते रात्री ११:३० या वेळेत घरात नातेवाईकांची वर्दळ आणि मेहेंदीचा कार्यक्रम सुरू होता. फिर्यादी झोपेत असताना आणि घरातील इतर सदस्य कार्यक्रमात व्यस्त असल्याचा फायदा घेत. अज्ञात चोरट्याने ड्रेसिंग टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेले ६ लाखांचे सोन्याचे दागिने शिताफीने चोरून नेले.

**पोलिसांत गुन्हा दाखल**

साखरपुडा आणि मेहेंदीच्या गडबडीत दागिने चौरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीनी शोधाशोध केली, मात्र दागिने मिळून आले नाहीत. अखेर ९ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी दापोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात जाली.

## कोकणात रंगणार कोस्टल हाफ मॅरेथॉनचा थरार

# जगातील पहिलीच मराठी भाषेला समर्पित मॅरेथॉन

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही नवीन वर्षाच्या पहिल्या रविवारी, म्हणजेच ४ जानेवारी २०२६ रोजी स्वागिरी शहर पुन्हा एकदा श्धावनगरी होणार आहे. सुवर्णसूर्य फाऊंडेशनच्या वतीने आयोजित कोकण कोस्टल हाम्फ मॅरेथॉनश्साठी संपूर्ण देश सज्ज झाला असून, तब्बल १२ राज्यांमधून आणि ३०० हून अधिक शहरांतून २२०० पेक्षा जास्त 'फिटनेस टुरिस्ट' स्वागिरीत दाखल होणार आहेत. हॉटेल सी फॅन्स येथे झालेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली.



मराठी भाषेला समर्पित पहिलीच मॅरेथॉन आजवर जगात कोणत्याही भाषेसाठी मरेथीन समर्पित केली गेली नव्हती, मात्र सुवर्णसूर्य फाऊंडेशनने के शिवधनुष्य पेलले आहे. ही मॅरेथॉन पूर्णपणे मराठी भाषेला समर्पित असेल, या स्पर्धेत जास्तीत जास्त मराठी संज्ञांचा वापर केला जाणार असून, जिथे अत्यावश्यक आहे तिथेच इंग्रजीचा वापर होईल, अशी माहिती फाऊंडेशनचे संचालक प्रसाद देवस्थली यांनी दिली.

**मॅरेथॉनची खास वैशिष्ट्ये:**

- **२१ किमीचा वन वे मार्ग:** ९ गावांमधून जाणारा आणि कोकणची जैवविविधता दर्शवणारा निसर्गरम्य मार्ग.
- **आकर्षक्त बक्षिसे:** प्रत्येक फिनिशरला आंब्याच्या आकाराचे मेडल.
- **कोकणी पाहुणचार:** शर्यत पूर्ण झाल्यावर समुद्रकिनारी मीळणारा गरमागरम उकडीचा मोदक,
- **संगीत आणि उत्साह:** अंकिता पाटकर यांच्या टीमचे झुंबा सेशन आणि आयपॉपस्टार फेम राथिका भिडे यांनी कंपोज केलेले विशेष गाणे.

# मंडणगडमध्ये एस.टी. बस दरीत कोसळून अपघात



**मंडणगड । प्रतिनिधी**

मंडणगडपासून अवघ्या १० किलोमीटर अंतरावर असलेल्या आआंजर्ला–नार्गोली मार्गावर (१० डिसेंबर) पहाटे २.२० वाजताच्या सुमारास एस. टी. बसचा गंभीर अपघात झाला. रस्त्यावरील चळणदार उत्तारावर बसचे नियंत्रण सुटल्याने ही बस जवळपास ५० फुट खोल दरीत कोसळली. अपघात अत्यंत भीषण असला तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

या अपघातग्रस्त बसमध्ये एकूण १६ प्रवासी होते. या दुर्घटनेत ३ जण जखमी झाले असून त्यापैकी बस वाहक के. डी. चाटे हे गंभीर जखमी असल्याची माहिती मिळते. चाटे यांच्या डाव्या गुडघ्याला मार, उजव्या पायाला खोल जखम तसेच कमरेला गंभीर दुखापत झाली आहे. उर्वरित दोन प्रवाशांना किरकोळ मार लागला असून त्यांचा जीवितास धोका नाही. नागरोली गावापुढे सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या धोकादायक यू–टर्नवर हा अपघात घडला. डावीकडे वळण आणि उतार असलेल्या या रस्त्यावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले.. चालक व्ही. पी. सोनवणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, बसचा ब्रेक अचानक काम न करणे हे अपघाताचे प्रमुख कारण ठरले. ब्रेक निकामी झाल्यानंतर वाहन पूर्णपणे अनियंत्रित बनले आणि बस सरळ दरीत कोसळली. या अपघातानंतर स्थानिक ग्रामस्थांनी तात्काळ धाव घेत बचावकार्य सुरू केले.

सर्व प्रवासी, चालक आणि वाहक यांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. त्यानंतर मार्ग तपासणी पथकाच्या मदतीने सर्व जखमींना मंडणगड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. उर्वरित प्रवाशांना मंडणगड येथे सुरक्षित पोहोचवण्यात आले. ही अपघातग्रस्त बस खोल दरीत अडकलेली असल्याने तिला बाहेर काढण्यासाठी क्रेनची आवश्यकता आहे. सकाळी क्रेन उपलब्ध झाल्यावर बस बाहेर काढण्याचे काम सुरू होणार आहे. काही प्रवाशांच्या बंगा, पिशव्या आणि मोबाईल यांसारख्या वस्तू बसमध्ये अडकलेल्या असल्याची माहिती देण्यात आली आहे. या अपघातामुळे आंजर्ला–मंडणगड मार्गावरील वाहतूक काही वेळ विस्कळीत झाली होती. मात्र, कोणतीही मोठी दुर्घटना न घडता सर्व प्रवासी सुखरूप बचावले, ही मोठी दिलासादायक बाब आहे.

# 'ओंकार' गोव्यातून पुन्हा सिंधुदुर्गात दाखल

**दोडामार्ग । प्रतिनिधी**

मागील तीन महिन्यांपासून गोवा राज्यात व सावंतवाडी तालुक्यात धुमाकूळ घालणाऱ्या 'ओंकार' हत्तीने दोडामार्ग तालुक्यात पुन्हा एन्ट्री केली आहे. बुधवारी सायंकाळी डोंगरपाल गावातून तो कळणे परिसरात दाखल झाला. या अनपेक्षित पुनरागमनामुळे हत्तीबाधित गावातील ग्रामस्थ व शेतकरी भयभीत झाले आहेत. एकीकडे गणेश टस्कर व दुसरीकडे ओंकार हत्ती दाखल झाल्याने वन विभागाची मात्र डोकेदुखी वाढली आहे.

सहा दिवसांपूर्वी तालुक्यातील बांबर्डे व घाटीवडे परिसरात 'गणेश' नामक टस्कर व मादी पिल्लूचे आगमन झाले. त्यांनी परिसरातील केळी, सुपारी, नारळ बागायतींचे नुकसान करण्यास सुरुवात केली आहे. एका बाजूला हे संकट घोंगावत असताना दुसऱ्या बाजूने 'ओंकार' हत्ती तालुक्यात माघारी परतला आहे. तीन महिन्यांपूर्वी कळपापासून अलग झालेला हा हत्ती गोवा राज्यात दाखल झाला. त्यानंतर लगतच्या सावंतवाडी तालुक्यातील बांदा परिसरात या हत्तीने थैमान घातले. एका शेतकऱ्याच्या गोठ्यात घुसून म्हशीवरही हल्ला केला



व तिला ठार केल्याची घटना घडली होती. याखेरीज एप्रिल महिन्यात मोर्ले गावातील एका शेतकऱ्याचा या हत्तीने पायदळी तुडवून बळी घेतला होता. त्यामुळे हा 'ओंकार' हत्ती पकडून न्यावा, अशी मागणी तालुक्यातून होऊ लागली. त्या पार्श्वभूमीवर वन विभागाचे प्रयत्नही सुरू झाले.

**ओंकारला पाठवायचे कुठे?**

सावंतवाडी तालुक्यात या हत्तीचा उच्छाद सुरू असताना हत्तीला पकडून वनतारात पाठविण्याची तयारीही वनविभागाने केली. मात्र त्याला काहींनी आक्षेप घेत तो तळकट वनक्षेत्रात पाठविण्याची मागणी केली. या मागणीला नळकट पंचक्रोशीतून जबर विरोध झाला व हत्ती या परिसरात नको अशी ठाम भूमिका येथील ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी घेतली. त्यामुळे या हत्तीला नेमके पाठवायचे कुठे? असा यक्षप्रश्नच वन विभागासमोर उभा राहिला.

**ओंकारला पिटाळताना ग्रामस्थांची धांदल!**

दोडामार्ग तालुक्यातून ओंकार हत्ती निघून गेल्याने येथील ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी सुटकेचा नि:श्वास सोडला होता. मात्र बुधवारी सायंकाळच्या सुमारास या हत्तीचे डोंगरपाल मार्गे कळणे परिसरात पुनरागमन झाले. हत्ती आल्याची माहिती स्थानिकांना समजताच त्याला पिटाळून लावण्याचा अयशस्वी प्रयत्न ग्रामस्थांनी केला. मात्र, हत्ती आपल्या मस्तीत व जोशात ग्रामस्थांच्या दिशेनेच चालत येऊ लागला. त्यामुळे ग्रामस्थांनी जीवाच्या भीतीने माघारी फिरणे पसंत केले.

**दोन हत्तींची भेट ही धोक्याची घंटा ?**

तालुक्यात सध्या ओंकार व गणेश हत्ती असल्याने ते एकत्र आल्यास त्यांच्यात द्वंद्व होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यात ग्रामस्थ किंवा शेतकऱ्यांवर हल्ला होण्याची भीती शेतकरी वर्गातून वर्तवली जात आहे. त्यामुळे वन विभागाने आक्रमक बनलेल्या ओंकार हत्तीला पकडावे. तसेच तालुक्यात असलेल्या गणेशसह दुसऱ्या हत्तीला पिटाळून लावावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.




**12वीचे शिक्षण पूर्ण होताच विद्यार्थ्यांसमोर सर्वात मोठे आव्हान उभे राहते—आता पुढे कोणता मार्ग निवडायचा? करिअर कोणते? कोणता कोर्स योग्य, कोणती परीक्षा द्यावी, कोणत्या कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावा, आपल्या गुणांप्रमाणे आणि क्षमतेप्रमाणे कोणता पर्याय योग्य? हे प्रश्न प्रत्येक विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना सतावतात. विशेषतः अभियांत्रिकी (Engineering), वैद्यकीय (Medical), फार्मसी (Pharmacy) किंवा इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी स्पर्धा परीक्षा अत्यावश्यक आहेत. या सर्वांमध्ये महाराष्ट्रात सर्वाधिक चर्चेत असते ती परीक्षा म्हणजे MHT-CET. त्याचबरोबर संपूर्ण भारतात मान्य असलेल्या JEE Main आणि JEE Advanced यांच्या महत्त्वामुळे अनेक विद्यार्थ्यांचा गोंधळ वाढतो. या लेखाचा उद्देश विद्यार्थ्यांना 12वी नंतरच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती देणे, CET आणि JEE मधील फरक समजावणे, कोणती परीक्षा कोणी द्यावी, या परीक्षांचे वेळापत्रक, जास्तीत जास्त जागा कुठे असतात, राज्यातील आणि देशातील उत्तम संस्थांची माहिती देणे आणि योग्य करिअर निवडताना होणारा गोंधळ कमी करणे हा आहे.**

**CET म्हणजे काय?**

MHT-CET (Maharashtra Health and Technical Common Entrance Test) ही महाराष्ट्रातील अभियांत्रिकी, फार्मसी, कृषी, बायोटेक्नॉलॉजी, फिशरी सायन्स आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी घेतली जाणारी राज्यस्तरीय प्रवेश परीक्षा आहे. ही परीक्षा विशेषतः राज्यातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. महाराष्ट्रातील 85% अभियांत्रिकीच्या जागांवर CET गुणांवरून प्रवेश होतो. फार्मसी, बायोटेक, कृषी यांसारख्या शाखांसाठी CET अनिवार्य आहे.

CET मध्ये Physics, Chemistry आणि Mathematics (PCM) किंवा Physics, Chemistry आणि Biology (PCB) अशी दोन गट परीक्षेत बसू शकतात. अभियांत्रिकीसाठी PCM आवश्यक; तर फार्मसीसाठी PCM/PCB दोन्ही चालतात.

**JEE Main म्हणजे काय?**

JEE Main (Joint Entrance Examination – Main) ही राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा आहे. ती मुख्यतः भारतातील NITs, IIITs, GFTIs (Government Funded Technical Institutes) आणि प्रमुख खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी असते.

JEE Main चे गुण केवळ प्रवेशासाठीच नाही तर JEE Advanced साठी पात्रता मिळवण्यासाठीदेखील महत्त्वाचे असतात.

**JEE Advanced म्हणजे काय?**

JEE Advanced ही भारतातील सर्वात कठीण आणि प्रतिष्ठेची अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा मानली जाते. या परीक्षेद्वारे IITs (Indian Institutes of Technology) मध्ये प्रवेश दिला जातो. JEE Advanced देण्यासाठी सर्वप्रथम JEE Main मध्ये सर्वोच्च गुण मिळवून देशातील टॉप विद्यार्थ्यांमध्ये स्थान मिळवणे आवश्यक असते.

**परीक्षांचे वेळापत्रक (साधारण प्रवृत्ती)**

- MHT-CET – दरवर्षी एप्रिल–मे मध्ये
- JEE Main – वर्षातून दोन ते तीन सत्रे (जानेवारी, एप्रिल, कधी कधी जुलै)
- JEE Advanced – सामान्यतः मे अखेर किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात

**किती जागा उपलब्ध असतात?**

**MHT-CET द्वारे प्रवेश:**

- महाराष्ट्रातील अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये सुमारे 1.2 ते 1.4 लाख जागा
- फार्मसीमध्ये 45,000+ जागा
- कृषी, बायोटेक, B.Sc. COURSES—10,000 ते 20,000 जागा

**JEE Main द्वारे प्रवेश:**

- NITs मध्ये एकूण 20,000+ जागा
- IIITs मध्ये 6,000+ जागा
- GFTIs मध्ये 5,000+ जागा




त्याचबरोबर अनेक खाजगी इंजिनियरिंग कॉलेजेस JEE Main स्कोअर स्वीकारतात.

**JEE Advanced द्वारे प्रवेश:**

- IITs मध्ये एकूण जागा सुमारे 16,000 (ही संख्या खूप कमी असल्याने स्पर्धा अत्यंत कठीण)

**सरकारी आणि खाजगी संस्था कोणत्या?**

**महाराष्ट्रातील नामांकित सरकारी अभियांत्रिकी महाविद्यालये:**

- COEP (Pune) – महाराष्ट्रातील सर्वोत्तम VJTI (Mumbai)
- Walchand College of Engineering (Sangli)
- SGGS (Nanded)
- Government College of Engineering – Amravati, Nagpur, Karad
- हे सर्व CET द्वारे प्रवेश देतात.

**महाराष्ट्रातील चांगली खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये:**

- MIT – Pune
- PICT – Pune
- VIT – Pune
- DY Patil College (Pune, Kolhapur)
- Bharati Vidyapeeth College of Engineering
- Ramrao Adik (Nerul)
- Sinhgad Institutes – Pune

यापैकी काही JEE Main स्कोअर स्वीकारतात; काही CET वरच प्रवेश देतात.

**भारतभरातील सर्वोत्तम संस्था – JEE द्वारे:**

- IITs – JEE Advanced
- NITs, IIITs, GFTIs – JEE Main
- BIT Mesra, Thapar University, Amrita University, Manipal University – बहुतांश JEE गुण स्वीकारतात

**JEE आणि CET – मुख्य फरक काय?**

- CET ही महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय परीक्षा आहे. तिचा अभ्यासक्रम १२वीच्या महाराष्ट्र बोर्डावर आधारित असतो. प्रश्नांची अवघडपातळी मध्यम असते. स्पीड आणि तथ्यज्ञान महत्त्वाचे ठरते.
- JEE Main ही राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा असून तिच्यात संकल्पनांची खोली, तर्कशक्ती आणि अनुप्रयोगक्षम ज्ञान तपासले जाते. गणित आणि भौतिकशास्त्र कठीण असते.
- JEE Advanced ही अत्यंत विश्लेषणात्मक, संकल्पनांवर आधारित आणि उच्च स्तरावरील विचारशक्तीची परीक्षा आहे. IIT मध्ये प्रवेशासाठी जगातील कठीण परीक्षांपैकी एक मानली जाते.

**विद्यार्थ्यांनी कोणती परीक्षा निवडावी?**

- हे पूर्णतः विद्यार्थ्याच्या क्षमता, अभ्यासाची आवड आणि भविष्यातील उद्दिष्टांवर अवलंबून आहे.

**JEE कोण द्यावे?**

- विज्ञान आणि गणितात चांगली पकड असलेले विद्यार्थी
- IIT/NIT/IIIT सारख्या उच्च गुणवत्तेच्या संस्थांमध्ये प्रवेश हवे असे विद्यार्थी
- संशोधन, तंत्रज्ञान, नवकल्पना, AI, रोबोटिक्स यांच्यात करिअर करायची इच्छा असलेले विद्यार्थी
- राष्ट्रीय स्तरावर स्पर्धेला तयार असलेले विद्यार्थी

**CET कोण द्यावे?**

- महाराष्ट्रातील अभियांत्रिकी/ फार्मसी /कृषी महाविद्यालयांमध्ये प्रवेश हवा असलेले विद्यार्थी
- १२वी बोर्डाचा अभ्यास उत्तम केलेले विद्यार्थी
- स्पीड आधारित प्रश्नपत्रिका सोडवणे जमणारे विद्यार्थी
- खूप कठीण JEE पातळीचा अभ्यास नको असलेले विद्यार्थी

**CET चे महत्त्व – JEE च्या तुलनेत का आवश्यक?**

- जास्तीत जास्त जागा CET मध्ये मिळतात – IIT/NIT मध्ये जागा खूप कमी. CET मधून राज्यातील मोठ्या प्रमाणात चांगल्या कॉलेजेसची उपलब्धता होते.
- परवडणारी फी – सरकारी CET कॉलेजेसची फी कमी असते.
- स्थानिक विद्यार्थ्यांसाठी आरक्षण – महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना 85% आरक्षण.
- करिअरच्या असंख्य शाखा – अभियांत्रिकी, फार्मसी, बायोटेक, कृषी, BSc कोर्सेस हे सर्व CET मार्फत.
- स्पर्धा तुलनेने सोपी – JEE मध्ये देशभरातून लाखो विद्यार्थी; CET मध्ये मुख्यतः राज्यातील विद्यार्थी.
- तयारी तुलनेने सोपी – CET १२वीच्या अभ्यासक्रमावर आधारित असल्याने विद्यार्थी JEE पेक्षा CET सहज पार करू शकतात.

**विद्यार्थ्यांचा गोंधळ — कसा सोडवावा?**

**१२वी नंतर विद्यार्थ्यांना सहसा खालील गोंधळ असतो :**

- JEE द्यावी का? फक्त CET पुरेसे का?
- कोणत्या कॉलेजला जास्त महत्त्व?
- IIT चांगले की COEP किंवा VJTI?
- कशी तयारी करावी?
- कोर्स कोणता निवडावा?

हा गोंधळ सोडवण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे—

**१. स्वतःची क्षमता ओळखा**


गणित आणि फिजिक्समध्ये उत्कृष्ट असाल तर JEE उत्तम पर्याय.
मध्यम स्वरूपाची तयारी हवी असेल तर CET पुरेसे.

**२. आवड तपासा**

IIT चे वातावरण, संशोधन संस्कृती, उच्च तंत्रज्ञान यात रस असेल तर JEE योग्य.
फार्मसी, बायोटेक, कृषी क्षेत्रात जायचे असेल तर CET आवश्यक.

**३. वास्तववादी ध्येये ठरवा**

जर १२वीपर्यंत JEE लेवलची तयारी केली नसेल तर CET वर फोकस करा.



**४. दोन्ही परीक्षा द्या**

बहुतेक विद्यार्थ्यांसाठी हा सर्वोत्तम पर्याय आहे.
JEE आणि CET दोन्ही देता येतात.
जिथे चांगला स्कोअर येईल तिथे प्रवेश मिळवणे सोपे जाते.

**खाजगी चांगली कॉलेजेस व त्यांच्या प्रवेश पद्धती**

महाराष्ट्रातील खासगी अभियांत्रिकी संस्थांमध्ये CET हा मुख्य आधार आहे. परंतु काही नामांकित संस्थांमध्ये JEE स्कोअर स्वीकारला जातो.

**उदा.:**

- MIT Pune – CET + JEE दोन्ही गुण स्वीकारतात
- VIT Pune – CET
- PICT – CET
- Ramrao Adik – CET
- DY Patil, Bharati Vidyapeeth – CET

**१ २वी नंतर विद्यार्थ्यांनी काय करावे?**

- CET व JEE दोन्हीसाठी अर्ज करावा
- आपली क्षमता आणि आवड ओळखून अभ्यासक्रम निवडावा
- CET ही सुरक्षितता देणारी परीक्षा आहे—म्हणून ती देणेच हिताचे
- JEE हे राष्ट्रीय पातळीवर स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी सर्वोत्तम व्यासपीठ

**CET चे महत्त्व — निष्कर्ष**

CET ही महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी एक सुवर्णसंधी आहे. IIT/NIT किंवा राष्ट्रीय संस्थांमध्ये प्रवेश मिळवण्याची क्षमता नसल्यास CET विद्यार्थ्यांना उत्तम अभियांत्रिकी, फार्मसी आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांकडे नेते. राज्यातील COEP, VJTI, Walchand सारखी महाविद्यालये CET मार्फत सहज मिळू शकतात. CET द्वारे जास्त जागा, परवडणारी फी, राज्यस्तरीय स्पर्धा आणि विस्तृत करिअर पर्याय मिळतात.

JEE आणि CET दोन्ही परीक्षा महत्त्वाच्या आहेत, मात्र विद्यार्थ्यांच्या ध्येयांनुसार योग्य निवड करणे आवश्यक आहे. CET दिल्यास राज्यातील उत्तम कॉलेजेसमध्ये प्रवेश मिळतो, तर JEE देऊन विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर मोठ्या संधी मिळवू शकतात.

शेवटी, करिअरचा निर्णय हा घाईघाईत न घेता, चिंतनपूर्वक, स्वतःची क्षमता ओळखून आणि योग्य मार्गदर्शन घेऊन घ्यावा. CET आणि JEE या दोन्ही परीक्षा तुमचे भविष्य घडवू शकतात—योग्य मार्ग निवडलात, योग्य तयारी केलीत, तर यश तुमचेच आहे.